## किरकोळ फौजदारी अर्ज क्र.११८/२०२५ मधील निशाणी ५ अर्जावरील आदेश.

प्रस्तुतच्या खटल्यामध्ये अर्जदार हिने महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम कलम २३ नुसार अंतरिम खावटीची मागणी केली आहे.

### अर्जदार हिचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –

२. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचा विवाह दि. २६.०४.२०२४ रोजी हिंदु रितीरिवाजा प्रमाणे अतिथी हॉटेल, अकोट येथे झाले आहे. सदर लग्नामध्ये अर्जदाराच्या आईवडीलांनी भेटवस्तु व संसार उपयोगी साहित्य दिले होते. अर्जदार ही नांदावयास गेल्या नंतर तिस–या दिवशी तिला घरातील भाडयावर सुहानी नाव दिसुन आले. त्यानंतर अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ सोबत गोंड पिपरी येथे नोकरीच्या ठिकाणी रहाण्यासाठी गेले. गैरअर्जदार क्र. १ याच्या मोबाईल मध्ये अनओळखी स्त्रीचे फोटो पत्नी सारखे दिसले. त्याबाबत विचारणा केली असता शिवीगाळ करुन मारहाण केली. पहिले लग्न असस्तीत्वात असताना लपवुन अर्जदारा सोबत दुसरे लग्न करुन फसवणुक केली आहे. गैरअर्जदार क्र. १ हा रात्री अपरात्री दारु पिवुन अर्जदार हिस मारहाण करीत होता. गैरअर्जदार क्र. २ हा सुध्दा अर्जदार हिस भिका–याची मुलगी असे म्हणुन अपमानित करीत होता. तसेच गैरअर्जदार क्र. ३ व ५ मारहाण करुन गैरअर्जदार क्र. १ यास प्रवृत्त करीत होते. गैरअर्जदार क्र. ४ व ६ वाईट नजर ठेवुन शिवीगाळ व मारुन टाकण्याची धमकी देत होते. गैरअर्जदार क्र. ७ ही कधी गैरअर्जदारांच्या घरी राहते, कधी स्वतःच्या घरी राहते. ती अर्जदार हिस पहिल्या लग्ना बद्दल सांगायचे नाही या करीता शिवीगाळ करुन मारहाण करीत होते. दि. २९/०५/२०२४ रोजी अर्जदार हिस मारहाण करुन डापकी रोड, अकोला येथे घेवुन आले. त्यानंतर घर बांधण्यासाठी रु. दहा लाख घेवुन येण्याची मागणी केली व दुसरे लग्नाचे फोटो व व्हीडिओ नष्ट करण्याचा प्रयत्न केला. दि. ३१/०५/२०२४ रोजी ०३.०० वा. च्या सुमारास अर्जदाराच्या आईवडील भेटण्यासाठी आले असता शिवीगाळ

करुन अर्जदार हिस त्यांच्या सोबत माहेरी हकलुन दिले. त्यानंतर अर्जदाराने पोलीस ठाण्यात रिपोर्ट दिला. अर्जदार हिस उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. याउलट गैरअर्जदार क्र. १ हा बॅक ऑफ इंडिया मध्ये नोकरीस असुन दरमहा रु. ७०,०००/– पगार मिळतो. त्यामुळे अर्जदार हिस दरमहा रु. २५,०००/– प्रमाणे अंतरिम खावटी मंजुर करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

३. गैरअर्जदार क्र. १ ते ७ यांनी आपले लेखी उत्तर नि.क्र. ११ वर सादर करुन अर्जातील सर्व कथन नाकरले आहे. तसेच असा आक्षेप घेतला आहे की, अर्जदार हिच्या सोबत गैरअर्जदार क्र. १ याचे कधीही लग्न झालेले नाही. केवळ साक्षगंध झाले आहे. अर्जदार ही कुठेही नांदण्यास आली नाही. त्यामुळे अर्जदार हिचा शारीरिक व मानसिक छळ करण्याचे कारण नाही. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ ची पहिली पत्नी हे नातेवाईक असल्याने अर्जदार व तिच्या वडीलांना गैरअर्जदार क्र. १ चे पहिले लग्न झालेले आहे याबाबत माहीती होती. तसेच गैरअर्जदार क्र. १ चे वडील व अर्जदाराची आई हे सख्खे मावस भाउबहीण असल्या कारणाने गैरअर्जदार क्र. १ याच्या लग्ना बाबत संपुर्ण माहीती होती. लग्ना बाबत बोलणी सुरु असताना पहिल्या पत्नी पासुन फारकती झाल्या नंतरच लग्न करायचे आहे असे ठरले होते. परंतु, अर्जदाराच्या वडीलांनी लग्न करण्याचा तगादा लावल्याने साक्षगंध करण्यात आला होता. गैरअर्जदार क्र. १ ही पहिली पत्नी पासुन फारकती झाली नसल्या कारणाने अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचे लग्न होवु शकले नाही. अर्जदार हिने गैरअर्जदार क्र. १ याच्या पहिल्या पत्नी सोबत कटकारस्तान रचुन आर्थिक व मानसिक त्रास देण्याच्या उद्वेशाने खोटा खटला दाखल केला आहे. अर्जदार ही पिडीता असल्याचे दिसुन येते त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अर्जदार हिचे अर्जातील कथन व गैरअर्जदार याचा खुलासा व

अभिलेखावरील कागदपत्रावरुन खालील मुद्दे विचारार्थी उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणांसहीत खालीलप्रमाणे नोंदवित आहे ः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ ते ७ यांच्या मध्ये कौटुंबिक नातेसंबंध असल्याचे सकृदर्शनी शाबित होते काय ? | ...नकारार्थी. |
| २. | अर्जदार हिचा गैरअर्जदार यांनी शारीरिक व मानसिक छळ केल्याचे सकृतदर्शनी शाबीत केले आहे काय ? | ...नकारार्थी. |
| ३. | अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे गैरअर्जदाराकडून अंतरिम खावटी मिळणेस पात्र आहे काय ? | ...नकारार्थी. |
| ४. | काय आदेश ? | ..अंतिम आदेशानुसार. |

## कारणमीमांसा

५. अर्जदार हिने आपल्या अर्जाच्या समर्थनाथ लग्नपत्रीका, लग्नाचे फोटो, प्रथम खबर अहवाल क्र. ३४६/२४ ची छायांकित प्रत सादर केले आहे. तसेच मा. सर्वोच्च न्यायालय यांचा **रजनिशी – वि– नेहा, फौजदार अपील क्र. ७३०/२०२०** मधील निर्देशानुसार मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र निशाणी क्र.०६ वर सादर केले आहे.

६. गैरअर्जदार याने आपल्या बचावामध्ये प्रथम खबर अहवाल क्र. ३४६/२४ ची छायांकित प्रत सादर केली आहे. गैरअर्जदार क्र. १ यास निर्देश देवुनही मालमत्ता व उत्तरदायित्वाचे शपथपत्र सादर केलेले नाही.

७. अर्जदारातर्फे विद्वान विधिज्ञ श्री. डी.डी.वर्मा यांचा युक्तीवाद ऐकला. गैरअर्जदारातर्फे श्री. एस.के.सुर्यवंशी यांचा युक्तिवाद ऐकला.

**<u>मुद्दा क्र.१ साठी</u> –**

८. महिलांचा कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा २००५ च्या कलम २० नुसार पिडीतग्रस्त महिलांना पोटगी देण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. तसेच कलम २३ नुसार कलम २० मधील पोटगी ही अर्ज दाखल झाल्यानंतर मुख्य अर्जाचा निकाल लागेपर्यंत अंतरिम स्वरुपात देण्याचा अधिकार देखील आहे. त्या करीता अर्जदार व गैरअर्जदार यांच्या मध्ये कौटुंबिक नातेसंबंध होते हे शाबित होणे अत्यंत आवश्यक आहे. गैरअर्जदार यांनी कौटुंबिक नातेसंबंधा बाबत गंभीर आक्षेप घेतलेला आहे. गैरअर्जदार यांनी घेतलेल्या बचावा नुसार गैरअर्जदार क्र. १ याचे पहिले लग्न अस्तीत्वात असताना अर्जदार हिच्या आईवडीलांनसोबत लग्नाची बोलणी सुरु होती. पहिल्या पत्नी पासुन फारकत घेतल्या नंतर लग्न करण्याचे ठरले होते परंतु अर्जदाराच्या वडीलांनी घाई केल्याने केवळ साक्षगंध कार्यक्रम करण्यात आला होता. अर्जदार कधीही नांदावयास आली नाही असा आक्षेप नोंदविला आहे. त्यामुळे अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांच्या मध्ये कौटुंबिक नातेसंबंधाबाबत गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे.

९. कौटुंबिक हिंसाचारा पासुन महिलांचे संरक्षण करण्या बाबत अधिनियम २००५ चे कलम २क मध्ये पिडीत व्यक्तीची व्याख्या नमुद करण्यात आली आहे. त्यानुसार "जिचा उत्तर वादी बरोबर कौटुंबिक नातेसंबंध असेल किंवा राहिला असेल अशी आणि उत्तरवादी कडुन जिच्या बाबतीत कोणतीही कौटुंबिक हिंसाचाराची कृती करण्यात आली आहे असा आरोपी करणारी कोणतीही महिला असा आहे" सदरील व्याख्याचा विचार करता पिडीत व्यक्तीचे उत्तरवादी सोबत कौटुंबिक नातेसंबंध असणे अत्यंत आवश्यक असल्याचे स्पष्ट होते. सदर कायद्यातील कलम २च नुसार कौटुंबिक नातेसंबंधाची व्याख्या नमुद करण्यात आली आहे. "त्यानुसार दोन व्यक्ती रक्तसंबंधाने, विवाहाद्वारे किंवा विवाहा सदृश्य नातेसंबंधाद्वारे, दत्तक संबंधाद्वारे सामाईक घरात एकत्र राहत असतील किंवा कोणत्याही वेळी एकत्र राहिले असतील, किंवा सयुक्त कुटुंब म्हणुन

एकत्र राहणा–या कौटुंबाचे सदस्य असतील अश्या दोन व्यक्ती मधील नातेसंबंध असा आहे." सदर व्याख्याचा विचार करता व प्रस्तुत अर्जातील अर्जदार हिच्या कथनाचा विचार करता तिने विवाह किंवा विवाह सदृश्य नातेसंबंधाद्वारे गैरअर्जदार यांच्या सोबत कौटुंबिक नातेसंबंध असल्याची भुमिका घेतल्याचे स्पष्ट होते. परंतु, गैरअर्जदार यांनी तसे कोणतेही नातेसंबंध प्रस्तापित झाल्या नसल्याचा आक्षेप घेतलेला आहे. तसेच सहभागी निवासस्थाना मध्ये कधीही सोबत राहिलेले नाही असा देखिल आक्षेप घेण्यात आलेला आहे.

१०. अर्जदार हिच्या कथनानुसार तिला गैरअर्जदार क्र. १ याच्या पहिल्या लग्ना बाबत शंका नांदावयास गेल्या नंतर तीन दिवसांनी आल्याचे सांगितले आहे ज्यावेळी तिला घरातील भाडयावर सुहाना नांव दिसले. त्यानंतर अर्जदार हिस गैरअर्जदार क्र. १ याच्या मोबाईल मध्ये अनओळखी स्त्रीचे फोटो पत्नी सारखे दिसले त्यावेळी पहिले लग्न जाणीवपुर्वक लपवुन ठेवल्याचे लक्षात आल्याचे कथन केले आहे. अर्जदार हिने गैरअर्जदार क्र. १ याच्या मोबाईल मध्ये अनओळखी स्त्रीचे फोटो कधी पाहिले याची तारीख नमुद केलेली नाही. तसेच तदनंतर इतर घटनाक्रम अर्जामध्ये नमुद केले आहेत परंतु त्या मध्ये कुठेही तारखेचा उल्लेख करण्यात आलेला नाही. केवळ दि. २९/०५/२०२४ रोजी मारहाण केल्याचे व ३१/०५/२०२४ रोजी माहेरी हकलुन दिल्याचे दोन तारखा नमुद करण्यात आलेल्या आहेत. अर्जदार हीस जर गैरअर्जदार क्र. १ याच्या पहिल्या लग्नाची कल्पना तिन दिवसात झाली होती तर त्याबाबत अर्जदाराने तक्रार का दाखल केली नाही असा प्रश्न निर्माण होतो. तसेच अर्जदार हिस आलेल्या शंकेबाबत तिने इतर कोणालाही त्वरीत माहीती दिल्याचे तिच्या कथनावरुन दिसुन येत नाही.

११. अर्जदार यांच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार हिची

फसवणुक करण्यात आली होती. तिला पहिल्या लग्नाची माहीती नव्हती. तिला जशी दुस–या लग्नाची माहीती झाली तशी तिने पोलीस ठाण्यात रिपोर्ट दिला आहे. तसेच अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांच्या लग्नाचे फोटो व लग्नपत्रीका सादर केली आहे त्यावरुन अर्जदार व गैरअर्जदार यांच्या मध्ये पतीपत्नी नातेसंबंध होते हे स्पष्ट होते. गैरअर्जदार यांनी सदर रिपोर्ट रद्द करुन मागण्यासाठी मा. उच्च न्यायालयात खटला दाखल केलेला नाही त्यामुळे त्यांना लग्न संबंध मान्य आहेत. याउलट गैरअर्जदार यांच्या विधिज्ञांनी लग्न झालेले नसल्याचे व कौटुंबिक नातेसंबंध नसल्याचा आक्षेप घेतला आहे. येथे असे नमुद करणे जरुरीचे वाटते की, गैरअर्जदार यांनी आपल्या लेखी जबाबामध्ये गैरअर्जदार क्र. १ याची पहिली पत्नी ही अर्जदार व तिच्या वडीलांची नातेवाईक आहे. तसेच गैरअर्जदार क्र. १ चे वडील व अर्जदाराची आई सख्खे मावस भाउबहीण असल्याचे स्पष्टपणे कथन केले आहे. त्यावरुन अर्जदार व गैरअर्जदार यांच्या कुटुंबामध्ये तथाकथित लग्नापुर्वी पासुन नातेसंबंध असल्याचे दिसुन येते. तसेच गैरअर्जदार क्र. १ याची पहिली पत्नी देखिल अर्जदार व तिच्या वडीलाची नातेवाईक असल्याचे दिसुन येते. अर्जदार हिच्या विधिज्ञांनी सदर बाब युक्तीवादा मध्ये नाकारली आहे. परंतु, गैरअर्जदार यांनी आपल्या लेखी जबाबाखाली सत्यापन व प्रतिज्ञालेख नोंदवुन मजकुर खरा व बरोबर असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे गैरअर्जदारा तर्फे प्रथमदर्शनी वरील नातेसंबंधा बाबत पुरावा अभिलेखावर सादर करण्यात आल्याचे स्पष्ट होते. त्यावर भरोसा न ठेवण्या करीता अर्जदाराचे कोणतेही कथन किंवा प्रथम दर्शनी पुरावा अभिलेखावर आलेला नाही. केवळ तोंडी युक्तीवादावरुन प्रथमदर्शनी पुराव्या कडे दुर्लक्ष करता येणार नाही.

१२. गैरअर्जदार क्र. १ याचे वडील व अर्जदार हिची आई यांच्या मधील असलेल्या नातेसंबंधाचा विचार करता अर्जदार हिच्या आईवडीलांना गैरअर्जदार क्र. १ याच्या पहिल्या लग्नाची माहीती असावी असा प्रथमदर्शनी अंदाज सर्वसामान्यपणे लावला

जावु शकतो जो सामान्य विवेक बुध्दीला पटण्या सारखा आहे. तसेच अर्जदार व तिचे वडील यांचे गैरअर्जदार क्र. १ याच्या पहिल्या पत्नी सोबत असलेले नातेसंबंधाचा विचार करता वरील बाबीला दुजोरा मिळत असल्याचे स्पष्ट होते. अर्जदार हिने आपल्या अर्जामध्ये पहिल्या लग्नाची माहीती कशी झाली याचा तपशील दिला असला तरी त्या बाबत तारखेचा उल्लेख करण्यात आलेला नाही. अर्जदार हिचे लग्न दि. २६/०४/२०२४ झाल्याचे कथन करण्यात आले आहे परंतु, अर्जदार हिने रिपोर्ट दि. २०/०७/२०२४ रोजी दिल्याचे स्पष्ट होते. म्हणजेच लग्ना नंतर सुमारे तिन महिन्याचे रिपोर्ट दिल्याचे स्पष्ट होते. अर्जदाराने रिपोर्ट देण्यासाठी ऐवढी वाट का पाहिली असा प्रश्न निर्माण होतो त्याचा खुलासा अर्जातील कथनातुन दिसुन येत नाही. त्यामुळे गैरअर्जदार याने प्रथम लग्नाची माहीती अर्जदार हिस होती असा घेतलेल्या आक्षेपा मध्ये प्रथमदर्शनी तथ्य दिसुन येत असल्याचे स्पष्ट होते. ज्यावेळी गैरअर्जदार क्र. १ याचे प्रथम लग्न अस्तीतवात आहे याची माहीती अर्जदार व तिच्या वडीलांना असताना देखिल लग्न करणे हे विवाह किंवा विवाह सदृश्य नातेसंबंधा मध्ये मोडणार नाही कारण दुसरे लग्न हे हिंदु विवाह कायदा नुसार अवैध आहे. त्यामुळे त्याची माहीती असताना दुसरे लग्न करणे हे विवाह सदृश्य नातेसंबंध ठरणार नाही. ज्यावेळी गैरअर्जदार हा फसवणुक करुन दुसरे लग्न करेल व प्रथम लग्नाची माहीती अर्जदाराला नसेल त्यावेळी विवाह सदृश्य नातेसंबंध ठरवु शकतात. परंतु, या खटल्या मध्ये अर्जदार व तिच्या आईवडीलांना गैरअर्जदार क्र. १ याच्या पहिल्या लग्नाची माहीती होती अशी प्रथमदर्शनी शंका निर्माण होते. त्याचे निरसन अर्जदारातर्फे करण्यात आलेले नाही. त्यामुळे वरील सर्व परिस्थीतीचा विचार करता अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांच्या मधील कौटुंबिक नातेसंबंधा बाबत गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे अश्या परिस्थीतीत त्यांच्या मध्ये कौटुंबिक नातेसंबंध असल्याचा प्रथमदर्शनी निष्कर्ष काढणे योग्य ठरणारे नाही. त्याबाबतची परिस्थिती पुराव्याअंती खटल्याचा अंतिम न्यायनिर्णय पारित करताना स्पष्ट होणारी आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी अर्जदार व गैरअर्जदार यांच्या मध्ये कौटुंबिक

नातेसंबंध असल्याचा निष्कर्ष काढला जावु शकत नाही. परंतु, त्याचा परिणाम मुख्य अर्जाच्या गुणदोषावर होणारा नाही कारण त्याबाबतची परिस्थिती पुराव्यातुन स्पष्ट होणारी आहे. त्यामुळे मुद्दा क्र. १ यास नकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ ते ४ साठीः</u>–**

१३. मुद्दा क्र. १ यास नोंदविलेल्या निष्कर्षा नंतर मुद्दा क्र. २ ते ३ यावर निष्कर्ष नोंदविणे योग्य होणारे नाही. सहाजिकपणे सदर निष्कर्ष हे प्रथमदर्शनी आहे त्याचा परिणाम मुख्य अर्जाच्या निकालावर होणारा नाही. त्यामुळे मुद्दा क्र. २ ते ३ यांना देखिल नकारार्थी उत्तर नोंदवुन मुद्दा क्र. ४ साठी खालील आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ARIF HARUN SHAIKH
Date: 2026.05.13 15:19:42 +0530

(ए.एच.शेख)
**न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,**
**(न्यायालय क्र. १), अकोट.**

दिनांकः १३/०५/२०२६.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file order are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of Steno | : R.C.Bajpai |
| Name of Court | : Shri. A. H. Shaikh<br>Judicial Magistrate First Class,<br>(Court No. 1), Akot. |
| Date of Order | : 13/05/2026. |
| Order signed by P.O. on | : 13/05/2026. |
| Order uploaded on | : 13/05/2026. |